**प्रेसनोट** **दिनांकः- ०४/०७/२०१९.**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## घरफोडीच्या गुन्हयातील विधी संघर्षित बालकाचे पोलीसांकडुन समुपदेश

फिर्यादी श्री. भवरलाल कचलानंद राठी, वय-४८ वर्षे, रा. लक्ष्मीपार्क,राजेंद्रनगर, पुणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांचे माताजी मेडीकल, सेनादत्त पेठ,पुणे हे मेडीकलचे दुकान दिनांक-२८/०६/२०१९ रोजी रात्रौ २२-४५ ते दिनांक-२९/०६/२०१९ रोजी सकाळी ०९-१५ वा.चे दरम्यान बंद असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयांनी त्यांचे दुकानाचे छतावर चढुन वरील बाजुस असलेल्या मोकळया जागेतुन प्रवेश करुन दुकानातील १,०७,०००/-रुपये रोख रक्कम व १२,०००/-रुपये किंमतीचा डी.व्ही.आर. असा एकुण १,१९,०००/-रुपये किंमतीचा माल घरफोडी चोरी करुन चोरुन नेलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर,गुन्हा नोंद क्रमांक-२५०/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे दिनांक-२९/०६/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यांत आलेला होता. सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान दिनांक-०१/०७/२०१९ रोजी विश्रामबाग पोलीस ठाण्याचे तपास पथकातील पोलीस शिपाई चेतन शिरोळकर यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीनुसार दोन विधी संघर्षग्रस्त बालकांना ताब्यांत घेवुन त्यांचेकडुन वरनमुद गुन्हयांतील चोरीस गेलेल्या मालापैकी १२,२१०/-रुपये रोख रक्कम व १२,०००/-रुपये किंमतीचा डी.व्ही.आर. असा एकुण २४,२१०/-रुपये किंमतीचा माल हस्तगत करुन वरनमुद घरफोडी चोरीचा गुन्हा ४८ तासांमध्ये उघडकींस आलेला आहे.

दरम्यान विश्रामबाग पोलीस ठाण्याचे कम्युनिटी पोलिसिंग ऑफिसर श्री. सच्चिदानंद शंकर कुळकर्णी, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांनी वरनमुद गुन्हयांतील विधी संघर्षित बालकांना विश्वासांत घेवुन पोलीसांचे विषयी त्यांचे मनामध्ये विश्वांस निर्माण करुन सदरवेळी त्यांचेकडे त्यांचे स्वतःचे जिवनाबाबत व त्यांचे कुटूंबियांतील सदस्यांबाबत मोठया आस्थेने विचारपुस करुन नमुद विधी संघर्षित बालकांना अशा प्रकारचे गुन्हे केल्यास त्यांचे भावी आयुष्यावर होणा-या दुष्परिणांबाबत माहीती देवुन अशाप्रकारचे गैरकृत्य पुन्हा न करणेबाबत समजावुन सांगितले. त्याचप्रमाणे त्यांचे शिक्षणाविषयी त्यांचेकडे प्रेमाने विचारपुस करुन त्यांनी त्यांचे पुढील शिक्षण घेणेबाबत व शिक्षणामुळे त्यांचे भावी आयुष्यामध्ये होणा-या फायद्यांबाबत कल्पना देवुन त्यासाठी त्यांना मदतीची आवश्यकता भासल्यास पोलीसांकडुन कशाप्रकारे आवश्यक ती कायदेशिर मदत केली जाईल याबाबत समजावुन सांगितले.

( दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर
( अतिरिक्त कार्यभार )